# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७/२८५८ दि. १६/१०/२०१७

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची सन २०१७-१८ पासून MahaDBT Portal व्दारे अंमलबजावणीबाबत...**

संदर्भः १. मा. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१७/ईबीसी/१२०४९, दि.१२.१०.२०१७.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे. सदरहू शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरिता प्रस्तावित सुधारीत दराने मिळणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना यापुढे **थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)** व्दारे देण्यात येणार असल्याने यापूर्वीची प्रचलित शिष्यृत्ती योजना अधिक्रमित करण्यात आलेली आहे.

सन २०१७-१८ पासून सदर शिष्यवृत्तीचे नविन व नुतनीकरणाचे अर्ज MahaDBT Portal व्दारे www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

**सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भिय शासन निर्णयातील सूचना, पात्रतेसाठीच्या अटी व शर्ती, शिष्यवृत्ती वितरणाची कार्यपध्दती इत्यादी बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन तशा स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. जेणेकरुन आपल्या महाविद्यालयातील एकही पात्र विद्यार्थी सदरहू योजनेपासून वंचित राहू नये. सदर योजनेपासून जर कोणी विद्यार्थी वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

सोबतः संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयाची प्रत.

RBhosle
17/10/17

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल